**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,**
नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवना समोर, तळ मजला पुणे - 411 001
फोन - 020-26123826 ईमेल- do5.igro@igrmaharashtra.gov.in

---

क्र.का.5/मुद्रांक-22/प्र.क्र.22/2015/१५२/22 दि. -२५/03/2022

**प्रति,**
President
Maharashtra Chamber of Housing Industry,
Maker Bhavan II, 4th Floor, 18,
V. Thackersey Marg, New Marine Lines,
Mumbai - 400 020.

विषय: Request for clarification with regard to applicability of 1% metro cess for the registration of document post 1st April 2022.

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन राजपत्र असा भाग ८ असा क्र. १०२ दि. २१/०८/२०१५.
२. महाराष्ट्र शासन राजपत्र असा भाग ४ असा क्र. ५६ दि. २८/१२/२०२०.
३. महाराष्ट्र शासन राजपत्र असा भाग एक-मध्य उप विभाग असा क्र. १७ दि.०८/०२/२०१९.
४. शासन आदेश क्र. एमआरडी-३३२०/प्रक्र. २४/नवि.७ दि. २८/०३/२०२०
५. CREDAI-MCHI मुंबई यांचे पत्र जा.क्र. MCHI/PRES/22-23/098 दि.16/03/22.

विषयांकित प्रकरणी संदर्भ क्रमांक ४ च्या पत्रान्वये आपले पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्रात आपण १ एप्रील २०२२ नंतर लागु होणाऱ्या मेट्रो अधिभाराच्या अंमलबजावणीविषयी विचारणा केलेली आहे.

संदर्भ क्रमांक ३च्या आदेशान्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी चिंचवड व नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील दस्तनोंदणीवरील मुद्रांक शुल्कामध्ये ०१.०४.२०२० पासुन पुढील दोन वर्षापर्यंतच्या कालावधी करीता सवलत देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दि. ३१/०३/२०२२ रोजी संपुष्टात येत आहे.

त्या अनूषंगाने कळविण्यात येते की, महत्वाकांक्षी नागरी परिवहन प्रकल्प राबविण्यात येत असलेल्या महानगरपालिका क्षेत्रात स्थावर मालमत्तेची अनुक्रमे विक्री, दान व फलोपभोग गहाण या संबंधीच्या संलेखांवर निष्पादनाच्या तारखेस लागु असलेल्या स्थावर मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या १ टक्का एवढा मेट्रो अधिभार आकारला जाईल. दि. ३१/०३/२०२२ पुर्वी निष्पादित केलेल्या वर उल्लेख केलेल्या संलेखांना सदरचा अधिभार लागणार नाही. परंतु दि. ०१/०४/२०२२ नंतर निष्पादित होणाऱ्या संलेखांवर निष्पादनाच्या तारखेस लागु असलेल्या स्थावर मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या १ टक्का मेट्रो अधिभार आकारला जाईल.

**का.प्र.वर मा.नों.म.नि.यांची सही असे.**

28/3/2022

(ज्ञानेश्वर खिलारी)

**सह नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक अधिक्षक**
**(मुख्यालय), महाराष्ट्र राज्य पुणे**

**प्रत (ई-मेलद्वारे) -**
अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई
सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक